| MHBI060001252024 | नि. फौ. खटला क्र. | : | २१/२०२४ |
|---|---|---|---|
| | शासन वि. आप्पासाहेब व ईतर | | |
| | निशाणी क्रमांक | : | १५ |

## अभियोगपक्षातर्फे सा.क्र.०१

**शपथेवर कथन करते/करतो की,**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **नाव** | : | नितीन वसंत आतकरे, | | | |
| **वय** | : | ३४ | वर्ष | **धंदा** | पोलीस अंमलदार/६७४ |
| **नेमणुक** | : | धारुर, ता. धारुर, जि. बीड. | | | |

**सरतपास अभियोगपक्षा तर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. एम. वाघमारे यांचे मार्फत**

मी आरोपींना ओळखतो. आज रोजी एक आरोपी न्यायालयात हजर आहे व दुस–या आरोपीचा गैरहजेरीचा अर्ज न्यायालयाने नि.क्र. १४ अन्वये मंजुर केलेला आहे. घटना ही दिनांक १८/१२/२०२३ रोजीची आहे. घटनेच्या दिवशी मी उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, अंबाजोगाई येथे पोलीस अंमलदार म्हणुन कर्तव्यावर होतो. त्यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी श्री सुनिल जायभाये यांनी अवैद्य धंद्यांवर कारवाई करण्यास सांगितले. त्यानंतर मी, ग्रेड पोलीस उपनिरीक्षक बोडखे, सहायक फौजदार सोडगीर, पोलीस हवालदार खरटमोल, उळे असे आम्ही सर्वजण उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयात हजर असतांना आम्हाला गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, पोलीस ठाणे अंबाजोगाई ग्रामीण हद्दीतील मौजे धानोरा बु. येथील बसस्टॅन्डजवळील पानटपरीमध्ये इसम नामे आप्पासाहेब निळकंठ हा लोकांकडुन विनापरवाना कल्याण मटका नावाचा जुगार खेळत व खेळवित आहे. अशी बातमी मिळाल्याने आम्ही सदरची बातमी उपविभागीय पोलीस अधिकारी यांना सांगुन त्यांच्या मार्गदर्शनाखाली सोबत दोन पंचाना बोलावुन अचानक १६.०० वाजता छापा मारला असता, मटका खेळणारे इसम पोलीसांना पाहुन पळुन गेले व मटका खेळविणारा इसम जागीच मिळुन आला. आम्ही त्यास त्याचे नाव गाव विचारले असता, त्याने त्याचे नाव आप्पासाहेब अंबादास निळकंठ, वय ६५ वर्ष असे सांगितले. सदर इसमाच्या ताब्यातुन आम्ही पंचासमक्ष रोख रक्कम रु. १६३०/– व

कल्याण मटका जुगाराचे साहित्य पो.ह. उळे यांनी जप्ती पंचनामा करुन जप्त केले. त्यानंतर सदर इसमास आम्ही मटक्याचे आकडे व पैसे कोणास देता असे विचारले असता, त्याने बुक्की मालक मनोज देशमुख रा. पाटोदा यास १० टक्के कमीशनवर देतो असे सांगितले. नंतर सदर इसमास पोलीस ठाण्यामध्ये आणुन मी फिर्याद दिली. आता मला दिनांक १८/१२/२०२३ रोजीची फिर्याद दाखवली. फिर्यादवर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहित आहे. फिर्यादीस **नि.क्र.१६** देण्यात आला.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्रीमती आय. वाय. पठाण यांच्या तर्फे**

छापेमारीच्या ठिकाणचा गट क्रमांक व चतुसिमा मी सांगु शकत नाही. जप्त नोटांचे क्रमांक मी सांगु शकत नाही. मी स्वत: आरोपीचा अंगझडती पंचनामा केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की,आरोपी हा कल्याण मटका घेत नव्हता, खेळत नव्हता व खेळवित देखील नव्हता. हे म्हणणे खरे नाही की,आरोपीच्या ताब्यातुन रोख रक्कम व मटका जुगाराचे साहित्य मिळुन आलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की,मी खोटया आशयाची फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की,आज रोजी मी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

Digitally signed by SAGADE PRAVIN PRABHAKAR
Date: 2026.04.02 17:10:03 +0530

दिनांक: ०२/०४/२०२६
अंबाजोगाई

(**प्रविण प्र. सागडे**)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(कोर्ट नं.१)अंबाजोगाई, जि. बीड.